**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ११५/२०१२ मध्ये निशाणी क्र. ८० वरील आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ याने त्याच्याविरुध्द झालेला ‘‘विना उलटतपासाचा’’ आदेश रद्द करुन त्यास वादीचा उलटतपास घेण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादी याने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दिलेले आहे.

२. प्रतिवादी क्र. ३ याचे असे म्हणणे आहे की, त्यास वादी याने पुरावा दाखल केल्याबाबत इतर प्रतिवादींकडून माहिती मिळाली नाही त्यामुळे तो वादीचा उलटतपास घेवू शकला नाही. परिणामी न्यायालयाने त्याविरुध्द ‘विना उलटतपास’ आदेश केलेला आहे. त्यास वादीचा उलटतपास घेण्याची संधी न मिळाल्यास त्याचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. सबब त्याने विना उलटतपासाचा आदेश रद्द होवून त्यास उलटतपास घेण्याची परवानगी मिळावी याकरीता प्रस्तुत अर्ज दाखल करुन तशी विनंती केली.

३. वादी याने अर्जावर अगदीच त्रोटक म्हणणे देवून, प्रकरणास विलंब करण्याचा प्रतिवादीचा उद्देश असल्याने अर्ज हा रु. २०००/— च्या खर्चावर मंजूर करावा अशी विनंती केली.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केल्यानंतर संधी देवूनही प्रतिवादी क्र. ३ याने वादीचा उलट तपास न घेतल्याने, त्याच्याविरुध्द विना उलटतपासाचा आदेश केलेला आहे. परंतू या ठिकाणी हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, मुळ दावा हा वाटपाकरीता आणलेला आहे. वादी व प्रतिवादी यांचे देखील दाव्यात अमुल्य हितसंबंध गुंतलेले आहेत. दाव्याचा निकाल गुणदोषावर व दोन्ही बाजूंना समान संधी देवून होणे अत्यावश्यक आहे. प्रतिवादीला उलटतपास घेण्याची संधी दिल्यास

वादीचे काहीच नुकसान होणार नाही. परंतू तशी संधी न मिळाल्यास प्रतिवादीचे नुकसान होण्याची अधिक शक्यता आहे. परंतू त्यासोबतच प्रतिवादीने केलेल्या विलंबामुळे वादीस नाहक संपरीक्षेकरीताचा विलंब सोसावा लागला आहे. त्यामुळे वादीस त्याकरीता प्रतिवादीकडून योग्य तो खर्च देणे आवश्यक आहे. परिणामत: मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

०१. प्रतिवादी क्र. ३ याने वादी यास रु. ५००/— खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. प्र.वादी क्र. ३ विरुध्दचा 'विना उलटतपास' चा आदेश रद्द करण्यात येतो व त्यास वादीचा उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Santosh Namdeo Rokade
Date: 2020.01.08 17:39:17 +0530

दिनांक — ०८/०१/२०२०

(एस. एन. रोकडे)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
बार्शी.

**CERTIFICATE**

I affirm that contents of this PDF file Order /Judgment are same word to word, as per the original Order /Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S. V. Ghongade. |
| Court | : | 2nd Jt. C.J.S.D., Barshi |
| Judgment /order signed by the Presiding Officer on | : | 08.01.2020. |
| Judgment / order uploaded on | : | 08.01.2020. |